18 DEC 2023
जनसंपर्क कक्ष
लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ग्रंथमहोत्सवाला दोन दिवसांत शेकडो वाचकांनी दिली भेट

## वैचारिक ग्रंथांना मागणी : शिवाजी विद्यापीठात आयोजन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या आमराई परिसरात सुरू असलेल्या ग्रंथमहोत्सवाला दोन दिवसांत शेकडो वाचकांनी भेट दिली. अनेक वैचारिक विषयांवरील ग्रंथांचीही विक्री झाली. यावेळी वेगळ्या विषयावरील ग्रंथांना मागणी होती हे सकारात्मक आहे, अशी प्रतिक्रिया ग्रंथविक्रेत्यांनी दिली.

विद्यापीठाच्या ६० व्या दीक्षांत समारंभाच्या निमित्ताने आयोजित केलेल्या महोत्सवाला रविवारी प्रारंभ झाला. यात स्थानिक प्रकाशकांसह राज्यभरातील २२ प्रकाशक आणि ग्रंथ विक्रेते सहभागी झाले आहेत. त्यांच्या स्टॉलवर विविध विषयांवरील हजारो ग्रंथ वाचकांना खरेदीसाठी उपलब्ध आहेत. या महोत्सवाला दोन दिवसांत शेकडो ग्रंथप्रेमी तसेच वाचनवेड्या व्यक्तींनी भेट दिली.



शिवाजी विद्यापीठाच्या आमराई परिसरात सुरु असलेल्या ग्रंथमहोत्सवाच्या स्टॉलवरील ग्रंथांची डॉ. दिगंबर शिर्के यांनी पाहणी केली. यावेळी डॉ. प्रमोद पाटील, डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. सुहासिनी पाटील उपस्थित होत्या.

याशिवाय दिव्यांगांनी बनविलेल्या वस्तूंच्या विक्रीचा हँडी हेल्प या संस्थेचा स्टॉल येथे आहे. तसेच अन्नपदार्थ विक्रीचे सात स्टॉल्स येथे आहेत. एम.बी.ए.अधिविभागाच्या विद्यार्थी-विद्यार्थिनींचेही ३ तसेच स्टार्टअप उपक्रमास वाहिलेलेही काही स्टॉल आहेत.

> ग्रंथमहोत्सवात वैचारिक पुस्तकांना मागणी असल्याचे चित्र दिसले. अनेकांनी आवर्जून आमच्या स्टॉलला भेट दिली. अनेक ग्रंथांची मागणी केली हे विशेष.
>
> - भाग्यश्री कासोटे-पाटील,
> भाग्यश्री प्रकाशन, कोल्हापूर.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 DEC 2023
पुण्यनगरी

# ग्रंथ महोत्सवास प्रतिसाद

कोल्हापूर : प्रतिनिधी

शिवाजी विद्यापीठाच्या ६० व्या दीक्षान्त समारंभाचे औचित्य साधून 'ग्रंथ महोत्सव-डिसेंबर २०२३'चे आयोजन दि. १६ ते १८ डिसेंबरदरम्यान करण्यात आले आहे.

यामध्ये एकूण २२ प्रकाशक व ग्रंथ विक्रेते सहभागी झाले आहेत. त्याचबरोबर हँडीहेल्प या संस्थेने दिव्यांगांनी बनवलेल्या वस्तूंच्या विक्रीचा स्टॉल मांडला आहे. या ठिकाणी अन्नपदार्थ विक्रीचे ७ स्टॉल आहेत. एम.बी.ए. अधिविभागाच्या विद्यार्थी-विद्यार्थिनींचेही त्यात ३ स्टॉल आहेत. तसेच स्टार्टअप उपक्रमास वाहिलेलेही काही स्टॉल आहेत, त्यांना विद्यार्थ्यांतून चांगला प्रतिसाद मिळत आहे.

जनसंपर्क कक्ष
18 DEC 2023 पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'स्वररंगां'त रंगले शिवाजी विद्यापीठ

## संगीत व नाट्यशास्त्र विभागाच्या सांस्कृतिक कार्यक्रमास प्रतिसाद

- दीक्षांत समारंभानिमित्त ग्रंथ महोत्सवात आयोजन
- मराठी, हिंदी चित्रपट गीतांचे सादरीकरण

कोल्हापूर: पुढारी वृत्तसेवा

दीक्षांत समारंभानिमित्त ग्रंथमहोत्सवामध्ये संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या स्वररंग सांगीतिक कार्यक्रमात अवघे शिवाजी विद्यापीठ रंगले.

शिवाजी विद्यापीठाच्या ६० व्या दीक्षांत समारंभानिमित्त संगीत व नाट्यशास्त्र अधिविभाग, विद्यार्थी विकास विभाग व बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने राजर्षी शाहू सभागृहात कार्यक्रम झाला.




कोल्हापूर : स्वररंग कार्यक्रमात सादरीकरण करताना संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाचे विद्यार्थी.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी हिंदी-मराठी चित्रपट गीतांसह सुफी, लोकधारा, लावणी व कव्वालींचे सादरीकरण केले. दोन तास चाललेल्या कार्यक्रमात पंधराहून अधिक गाणी सादर करून विद्यार्थ्यांनी सारे सभागृह मंत्रमुग्ध करून सोडले.

गायक सौरभ बुवा, ऋचा गावंदे, अनिकेत निर्मळे, प्रियांका मिरजकर, मयुरी जाधव व अन्य विद्यार्थ्यांसह प्रशांत देसाई (तबला), विक्रम परीट (ढोलकी), आकाश साळोखे (पियानो), मनोज जोशी (ऑक्टोपॅड) यांनी संगीतसाथ केली. श्रीधर जाधव यांनी साऊंड सिस्टीम सांभाळली.

यावेळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्र संचालक डॉ. धनंजय सुतार, अंतर्गत लेखापरीक्षक अजित चौगुले, उपकुलसचिव प्रिया देशमुख, लेखापाल वैशाली थोरात, संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाचे डॉ. विनोद ठाकूर-देसाई, डॉ. निखिल भगत, डॉ. प्रकाश बिलावर आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 DEC 2023
सकाळ

# विद्यापीठात रंगला 'स्वररंग'

## ग्रंथमहोत्सवात सांस्कृतिक कार्यक्रम

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १७ : शिवाजी विद्यापीठाच्या ६० व्या दीक्षान्त समारंभानिमित्त आयोजित ग्रंथमहोत्सवामध्ये संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या 'स्वररंग' या सांगीतिक सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये अवघे विद्यापीठ रंगले. संगीत व नाट्यशास्त्र अधिविभाग, विद्यार्थी विकास विभाग आणि बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्रातर्फे राजर्षी शाहू सभागृहात कार्यक्रम झाला.

विद्यार्थ्यांनी हिंदी-मराठी चित्रपट गीतांसह सुफी, लोकधारा, लावणी आणि कव्वालीचे अत्यंत बहारदार सादरीकरण केले. दोन तासांहून अधिक काळ चाललेल्या या कार्यक्रमात पंधराहून अधिक गाणी विद्यार्थ्यांनी सादर करून सारे सभागृह मंत्रमुग्ध करून सोडले. गायक सौरभ बुवा, ऋचा गावंदे, अनिकेत निर्मळे, प्रियांका मिरजकर, मयुरी जाधव आणि अन्य विद्यार्थ्यांसह प्रशांत देसाई (तबला), विक्रम परीट (ढोलकी), आकाश साळोखे (पियानो), मनोज जोशी (ऑक्टोपॅड) यांनी संगीतसाथ केली. श्रीधर जाधव यांनी ध्वनी यंत्रणेची जबाबदारी सांभाळली. कार्यक्रमास कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील आदी उपस्थित होते.

### ग्रंथमहोत्सवास प्रतिसाद

या दीक्षान्त समारंभानिमित्त आयोजित ग्रंथमहोत्सवात विविध पुस्तके, डेटाबेस पॅकेज, डिजिटल ग्रंथ आदींचे स्टॉल लागले आहेत. त्या ठिकाणी विद्यार्थी, प्राध्यापक, कर्मचारी आणि नागरिकांनी हजेरी लावली. उद्या सोमवारी रात्री नऊ वाजेपर्यंत ग्रंथमहोत्सव सुरू राहणार आहे.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ६० व्या दीक्षान्त समारंभातील ग्रंथमहोत्सवानिमित्त आयोजित 'स्वररंग' कार्यक्रमात रविवारी सादरीकरण करताना संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाच्या विद्यार्थिनी.

जनसंपर्क कक्ष
18 DEC 2023 पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# वाचकाला त्याचेच पुस्तक मिळाले आठ वर्षांनी परत !

## शिवाजी विद्यापीठाच्या ग्रंथ महोत्सवास वाचकांचा प्रतिसाद




कोल्हापूर : दूरशिक्षण विभागातील प्रा. डॉ. नितीन रणदिवे यांना त्यांचेच पुस्तक पुन्हा भेट देताना यशवंत बुक स्टॉलचे नेताजी कदम.

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या ६० व्या दीक्षांत समारंभाच्या निमित्ताने आयोजित ग्रंथ महोत्सवात एका वाचकाला त्याचेच पुस्तक आठ वर्षांनी परत मिळाल्याची दुर्मीळ घटना घडून आली. ग्रंथोत्सवास वाचकांचा प्रतिसाद लाभत आहे. दीक्षांत समारंभ मुख्य दिवशी विद्यार्थी, महाविद्यालयांचा पुस्तक खरेदीला अधिक प्रतिसाद लाभेल, अशी अपेक्षा आहे.

विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे सहायक प्रा. डॉ. नितीन रणदिवे ग्रंथ महोत्सवात खरेदीसाठी पुस्तकांची पाहणी करीत होते. तेथे विविध पुस्तके पाहताना ज्येष्ठ विचारवंत आ. ह. साळुंखे यांचे 'सर्वोत्तम भूमिपुत्र : आक्षेप- डॉ. आंबेडकरांची विचारधारा आणि लेखकाची भूमिका' हे पुस्तक नजरेस पडले. ते त्यांनी कुतुहलाने हातात घेऊन पाहिल्यावर आश्चर्याचा धक्का बसला. त्यांच्या पत्नी विजया यांनी २०१५च्या व्हॅलेंटाईन डे ला त्यांना हे पुस्तक भेट दिले होते. त्यावर त्यांनी नितीन यांचे नाव लिहून स्वाक्षरी केली होती. त्यांच्याकडून कोणीतरी हे पुस्तक वाचण्यासाठी म्हणून घेऊन गेले होते, मात्र परत न करता रद्दीत घातले होते. तेच पुस्तक यशवंत बुक स्टॉलवर आठ वर्षांनी परत मिळाल्याचा आनंद डॉ. रणदिवे यांनी व्यक्त केला. अशा प्रकारे डॉ. रणदिवे यांना त्यांची व्हॅलेंटाईन गिफ्ट विद्यापीठाच्या ग्रंथमहोत्सवामुळे आठ वर्षांनी परत मिळाली.